मंगळवार दि. ०९ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २७८ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## छत्रपती मल्टीस्टेट घोटाळ्यात मोठी कारवाई; दोन संचालक अटकेत

### आर्थिक गुन्हे शाखेची धडक मोहीम; न्यायालयाने सुनावली चार दिवसांची पोलीस कोठडी

**जालना । प्रतिनिधी**

छत्रपती मल्टीस्टेट सोसायटीच्या माध्यमातून गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत जालना प्रकरणातील दोन संचालकांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये राजीव सतीशराव काळे (वय ४०, रा. धनगर गल्ली, गेवराई, जि. बीड) आणि विठ्ठल पांडुरंग रुचके (वय ४७, रा. सिरसदेवी, ता. गेवराई, जि. बीड) यांचा समावेश असून न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, जालना करीत असून अधिक आरोपींचा शोध आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**जास्त व्याजाचे आमिष दाखवून ठेवीदारांची फसवणूक**

सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २८९/२०२५ अन्वये भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ४०९, ३४ तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंरक्षण अधिनियम () अंतर्गत कलम ३, ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासादरम्यान असे समोर आले की, छत्रपती मल्टीस्टेट सोसायटीचे चेअरमन संतोष बसवंत भंडारी, संचालक मंडळातील सदस्य आणि व्यवस्थापक यांनी सर्वसामान्य नागरिकांना व गुंतवणूकदारांना आकर्षक आणि बाजारपेठेपेक्षा अधिक व्याजदर देण्याचे आमिष दाखवून मोठ्या प्रमाणावर ठेवी स्वीकारल्या. मात्र मुदत पूर्ण झाल्यानंतर ठेवीदारांना त्यांचे पैसे परत करण्यात आले नाहीत.

विशेष म्हणजे, काही ठिकाणी स्वतः चेअरमन संतोष भंडारी यांनी गुंतवणूकदारांच्या घरी जाऊन त्यांना ठेव ठेवण्यासाठी प्रवृत्त केल्याचेही तपासात समोर आले आहे.

**तीन जिल्ह्यांमध्ये विस्तारलेल्या शाखांचे जाळे**

पोलिसांच्या माहितीनुसार, संतोष भंडारी यांच्या नियंत्रणाखालील या संस्थेच्या एकूण २१ शाखा कार्यरत होत्या. या शाखांद्वारे छत्रपती संभाजीनगर, बीड आणि जालना जिल्ह्यांतील नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर ठेवी जमा करण्यात आल्या.

संस्थेच्या व्यवहारांबाबत अनेक तक्रारी आल्यानंतर आर्थिक गैरव्यवहार आणि फसवणुकीचा संशय बळावला. त्यानंतर दाखल झालेल्या तक्रारींच्या आधारे पोलिसांनी सखोल तपास सुरू केला.

**१ कोटी ३१ लाखांहून अधिक रकमेची फसवणूक उघड**

फिर्यादी व साक्षीदारांच्या जबाबांवरून आतापर्यंत १ कोटी ३१ लाख ४४ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. तपास यंत्रणांच्या मते ही रक्कम आणखी वाढण्याची शक्यता असून इतर ठेवीदारांनीही पुढे येऊन तक्रारी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासात अटक करण्यात आलेल्या दोन्ही संचालकांचा संस्थेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये आणि ठेवीदारांकडून निधी उभारणीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली.

**आणखी धागेदोरे शोधण्यासाठी पोलीस कोठडी**

न्यायालयाने आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्यानंतर आता त्यांच्या चौकशीतून संस्थेतील इतर जबाबदार व्यक्ती, निधीचा वापर, मालमत्ता हस्तांतरण, बँक व्यवहार आणि फसवणुकीच्या एकूण व्याप्तीबाबत महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

तपास अधिकाऱ्यांकडून आर्थिक कागदपत्रे, ठेवीदारांची माहिती, मालमत्ता व्यवहार आणि बँक खात्यांची छाननी सुरू असून या घोटाळ्याचे जाळे आणखी विस्तृत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक , अपर पोलीस अधीक्षक आणि प्रभारी पोलीस उपअधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या मोहिमेत सहाय्यक पोलीस निरीक्षक मिथुन घुगे, पोलीस उपनिरीक्षक शैलेश म्हस्के तसेच आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

**ठेवीदारांमध्ये आशेचा किरण**

दीर्घकाळापासून आपल्या गुंतवणुकीच्या रकमेची प्रतीक्षा करणाऱ्या ठेवीदारांसाठी या अटकेची कारवाई महत्त्वाची मानली जात आहे. तपासाची व्याप्ती वाढत असून घोटाळ्यातील इतर आरोपींवरही लवकरच कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## वृत्तपत्र प्रकाशकांनो सावधान; २ लाखांचा दंड!

### वार्षिक विवरणपत्र सादर करा; पीआरजीआयचा देशभरातील वृत्तपत्र, मासिक व नियतकालिक प्रकाशकांना अंतिम इशारा

**नवी दिल्ली - वृत्तसेवा**

: प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ पिरिऑडिकल्स () कायदा २०२३ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या सर्व वृत्तपत्रे, मासिके आणि अन्य नियतकालिकांच्या प्रकाशकांना आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक विवरणपत्र ( ) ऑनलाइन सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी ३० जून २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली असून त्यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा प्रेस रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया () यांनी दिला आहे.

पीआरजीआयने जारी केलेल्या सल्लागार सूचना ( . ११ २०२६) मध्ये नमूद करण्यात आले आहे की, सर्व नोंदणीकृत प्रकाशकांनी प्रेस सेवा पोर्टल ( - ) वर जाऊन वार्षिक विवरणपत्र ऑनलाइन भरून सादर करणे बंधनकारक आहे. अद्याप हे विवरणपत्र न भरलेल्या प्रकाशकांना ही शेवटची संधी देण्यात आली आहे.

**दंडात्मक कारवाईचा इशारा**

प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ पिरिऑडिकल्स कायदा २०२३ च्या कलम १४(३) नुसार, निर्धारित मुदतीत वार्षिक विवरणपत्र सादर न करणाऱ्या प्रकाशकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

यामध्ये प्रथमच नियमभंग झाल्यास ₹१०,००० दंड वारंवार नियमभंग झाल्यास वाढीव दंड एकूण दंडाची कमाल मर्यादा ₹२ लाखांपर्यंत अशी तरतूद करण्यात आली आहे.

**वार्षिक विवरणपत्र का महत्त्वाचे?**

वार्षिक विवरणपत्रामध्ये संबंधित वृत्तपत्र किंवा नियतकालिकाची प्रकाशन माहिती, मालकी हक्क, प्रसार संख्या, मुद्रण तपशील आणि इतर प्रशासकीय माहिती नोंदविली जाते. केंद्र सरकारच्या नोंदी अद्ययावत ठेवण्यासाठी ही माहिती अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

**प्रकाशकांनी काय करावे?**

पीआरजीआयच्या सूचनेनुसार प्रकाशकांनी:
प्रेस सेवा पोर्टलवर लॉग-इन करावे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक विवरणपत्र भरावे.
आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. ३० जून २०२६ पूर्वी प्रक्रिया पूर्ण करावी.

देशभरातील प्रकाशकांना आवाहन
पीआरजीआयने देशभरातील सर्व वृत्तपत्र, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक आणि अन्य नियतकालिकांच्या प्रकाशकांना अंतिम मुदतीपूर्वी विवरणपत्र सादर करण्याचे आवाहन केले आहे. मुदतीनंतर कोणतीही सवलत किंवा मुदतवाढ मिळणार नसल्याने प्रकाशकांनी तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, असेही सूचनेत नमूद करण्यात आले आहे.

विशेष
पत्रकारिता क्षेत्रात नव्या -२०२३ ची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर नियतकालिकांच्या नोंदणी व अहवाल सादरीकरण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर डिजिटलायझेशन करण्यात आले आहे. त्यामुळे आता सर्व प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने पार पाडणे अनिवार्य झाले आहे.

## कदीम जालना पोलिसांची मोठी कारवाई; एमडी ड्रग्ससह आरोपी जेरबंद

### ३९ हजारांचे एमडी सदृश ड्रग्स जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात अंमली पदार्थांच्या वाढत्या अवैध व्यापाराविरोधात कदीम जालना पोलिसांनी मोठी कारवाई करत एमडी (मेफेड्रोन) या प्रतिबंधित अंमली पदार्थासह एका आरोपीला रंगेहात अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी ३९ हजार १५० रु चे एमडी ड्रग्ससह कार, मोबाईल, वजनकाटा आणि अन्य साहित्य असा ४ लाख ५० हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अफरोज जाफर शेख (वय ४५, रा. प्लॉट नं. ४२, हिना नगर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर) असे आहे. या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३०१/२०२६ दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांना ८ जून २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास एक व्यक्ती मेरीट हॉटेल ते रेल्वे स्टेशन परिसरात एमडी पावडर विक्रीसाठी येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. या

### जालना जलकवच अभियान२०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना

## जिल्हाधिकाऱ्यांकडून सर्व ग्रामसेवक व अधिकाऱ्यांचा व्हीसीद्वारे आढावा

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात संभाव्य कमी पर्जन्यमान, पाणीटंचाई व भूजल पातळीतील घट यांचा विचार करून जिल्हा प्रशासनामार्फत ''जालना जलकवच अभियान२०२६'' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे () बैठक घेतली.

सदर बैठकीस जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल, निवासी उपजिल्हाधिकारी श्री शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी (रोहयो)




श्रीमती मनिषा दांडगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) श्री संदीप पवार यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक तसेच कृषी, पाणीपुरवठा व इतर संबंधित विभागांचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

**बैठकीतील प्रमुख निर्देश**

जल पंचायतींची स्थापना व जल नियोजन
प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये जल व्यवस्थापनासाठी स्थानिक पातळीवर जल पंचायत अथवा पाणी वापरकर्ता गट सक्रिय करावेत. गावनिहाय जल अंदाजपत्रक तयार करून उपलब्ध जलस्रोतांचे नियोजन करावे.

**पावसाच्या पाण्याचे संकलन**

घर, शाळा, शासकीय इमारती व संस्थांमध्ये छतावरील पावसाच्या पाण्याचे संकलन करण्यासाठी जनजागृती करावी व कमी खर्चातील स्थानिक पद्धतींचा प्रसार करावा.

**जलतारा व भूजल पुनर्भरण**

प्रत्येक ग्रामपंचायतीने शोषखड्डे (जलतारा), रिचार्ज शाफ्ट, पाझर संरचना व इतर भूजल पुनर्भरणाच्या उपाययोजनांना प्राधान्य द्यावे.

**श्रमदानातून जलसंधारण**

श्रमदानाच्या माध्यमातून गाळ उपसा, नालाबांध, वनराई बंधारे, सैल दगडी बांध आणि इतर ()

## रोहिणी बरसाल्या, टेंभुर्णी परिसरामध्ये शेतीच्या कामांना व लागवडीला वेग आला

**दत्ता देशमुख**

पावसाच्या पहिल्या शिडकाव्यानंतर टेंभुर्णी व अकोला देव पापळ परिसरात शेतीच्या कामांना वेग; खते, बियाणांच्या वाढत्या भावाबद्दल शेतकऱ्यांची खंत

रोहिणी नक्षत्राच्या पावसाने हजेरी लावताच टेंभुर्णी आणि अकोला देव पापळ शिवारात पेरणीपूर्व मशागतीला वेग आला आहे. उन्हाने तापलेल्या जमिनीत ओलावा निर्माण झाल्याने शेतकऱ्यांनी बैलजोड्या जुंपून नांगरणीची कामे सुरू केली आहेत.



मुलांच्या शिक्षणाचा खर्च आणि मुलीचे लग्न यांसारख्या जबाबदाऱ्या पिकावरच अवलंबून असल्याचे ५० वर्षीय शेतकरी फकीरबा एकनाथ सोनसाळे यांनी सांगितले. खते, बियाणे आणि औषधांचे भाव गगनाला भिडले असताना, शासनाकडून शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून महिला वर्गानेही शेतीच्या कामांना सुरुवात
शेतातील काडीकचरा वेचणे आणि बीजप्रक्रियेवर त्यांचा भर आहे. घरची
कामे आवरून शेत हेच आमचे देवघर, या भावनेतून महिला काम करत असल्याचे
सीमा यांनी सांगितले.

**मूग, उडीद आणि बाजरी पेरणीसाठी**

अन्नदात्याची आठवण ठेवा
शेतकऱ्याच्या कष्टाची जाणीव ठेवावी. ग्राहकांनी शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करताना याची जाणीव ठेवावी की शेतकऱ्यांनी कष्टाने ते पिकवलेले असते. शेतकऱ्यांनी खते आणि बियाण्यांची जुळवाजुळव अंतिम टप्प्यात आहे. यंदा पाऊस चांगला पडून पिकांना योग्य भाव मिळावा, अशी आशा शेतकऱ्यांना आहे. दरम्यान, शहरी भागातील नागरिकांनी शेतकऱ्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून भाजीपाला खरेदी करताना योग्य मोबदला द्यावा, असे आवाहन संतोष आवटी यांनी केले आहे.

## परतूर शहरात विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा शौचालय प्रश्न कधी सुटणार

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर शहरात विकासाच्या नावाखाली अनेक वर्षांपासून रखडलेले शौचालय आहे पण विकास कामात शौचालय कधी होणार हा एक मोठा प्रश्न आहे. मोंढा भागातील रेल्वे स्टेशन रोड समोर अत्यंत महत्त्वाची समस्या निर्माण झाली आहे.जुनी पोलीस चौकी पाडण्यात आली.



शौचालयाचा आर्धा भाग पडलेल्या अवस्थेत असताना आता नव्याने मोठे बांधकाम करून पुरुष व महिला साठी शौचालय करण्यात आले पाहिजे म्हणजे शहरातील व ग्रामीण भागातील नागरिकांना सौचालयाची समस्या दूर होऊ शकते.अर्धवट शौचालय पाडून नवीन मोठे तयार केले तर खऱ्या अर्थाने विकास कामात भर पडु शकते.परंतू नगरपालीका प्रशासन यांनी अनेक वर्षांपासून याकडे दुर्लक्ष केले आहे. नागरीक, माता भगिनी व व्यापारी यांनी या समस्या चा मार्ग काढायचा कसा हा प्रश्न मोठा आहे.नवीन शौचालय झाल्यास समस्या निर्माण होणार नाही.गेल्या अनेक वर्षांपासून शहरात विकासाच्या नावाखाली श्रेय घेत असताना सुद्धा एवढे मोठे विकासाचे काम मागे राहिले. आता भाजपच्या हाती नव्याने आलेली सता यांनी विकास कामात शहरात कुठेही कमतरता ठेवली नाही पण हि समस्या दूर करतील का.नवीन शौचालय झाल्यास विकासाचा तुरा म्हणून भर पडूशकते.

परतूर येथील नगरपालिका प्रशासन या कडे लक्ष केंद्रित करतील अशी अपेक्षा व्यक्त होताना दिसत आहे.परतूर व तालुक्यातील महिला पुरुष यांना आठवडी बाजाराच्या दिवशी शौचालय नसल्याने समस्या चा सामना करावा लागतो.शौचालय झाले तर शहरात विकासात भरपडू शकते आणि सर्वांची समस्या दूर होईल अशी अपेक्षा नागरिकांना आहे.पण या साठी मा.आमदार बबनराव लोणीकर यांच्या पुढाकाराने हि मोठी समस्या सुटू शकते.अशी चर्चा शहरातील नागरिकांत होताना दिसत आहे.

# संपादकीय...

## इंधन संकटाने महाराष्ट्र वेठीस, सरकार झोपेत

ग्रामीण भागाला प्राधान्याने डिझेल पुरवठा, साठेबाजीवर कठोर कारवाई आणि पुरवठा साखळीतील अडथळे दूर करणे आवश्यक आहे. अन्यथा पेट्रोल पंपांवरील रांगा उद्याच्या जनआक्रोशात परिवर्तित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवरच असेल. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पेट्रोल-डिझेलच्या टंचाईने गंभीर स्वरूप धारण केले. अनेक जिल्ह्यांतील पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या आहेत. काही ठिकाणी शेतकऱ्यांना डिझेलसाठी तासनतास प्रतीक्षा करावी लागत आहे, तर अनेक पंपांवर 'डिझेल उपलब्ध नाही' अशा पाट्या झळकत आहेत. खरीप हंगामाच्या उंबरठ्यावर निर्माण झालेली ही परिस्थिती ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. मात्र सरकारकडून या संकटाची तीव्रता मान्य करण्याऐवजी 'टंचाई नाही' असा खोटा दावा करून वास्तव झाकण्याचा प्रयत्न सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने राज्यात इंधन टंचाई नसल्याचे सांगत आहेत. परंतु प्रत्यक्षात ग्रामीण महाराष्ट्राचे चित्र वेगळे आहे. जर परिस्थिती नियंत्रणात असेल, तर पेट्रोल पंपांवर मध्यरात्रीपासून रांगा का लागत आहेत? शेतकरी डिझेलच्या शोधात गावोगाव का फिरत आहेत? ट्रॅक्टर, पंपसेट आणि शेती मशागतीची यंत्रे ठप्प का पडत आहेत? गेल्या आठ दिवसांत पेट्रोल, डिझेलच्या दरात प्रति लिटर ८ रुपये आणि सीएनजीच्या दरात प्रति किलो ५ रुपयांपेक्षा अधिकची वाढ झाली आहे. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरवाढीमुळे खाद्यपदार्थांच्या किमतीत अगोदरच वाढ झालेली आहे. त्यामुळे सरकारच्या दाव्यांपेक्षा जमिनीवरील वास्तव खूप गंभीर आहे. पंतप्रधानांनी इंधनाचा वापर जपून करण्याचे सांगितल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी एक दिवस बुलेटने फिरण्याची स्टंटबाजी केली. पण त्या बुलेटस्वारीचे फोटो आणि व्हिडीओ शूट करण्यासाठी ८-१० कॅमेरे आणि गाड्या वापरल्या जात होत्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार वापरायला सुरुवात केली, पण त्यांच्या मागेपुढे डिझेल, पेट्रोलवर चालणाऱ्या किमान डझनभर गाड्या असतात. सत्ताधारी पक्षाचे बहुतांश मंत्री आणि आमदार लँड क्रुझर, रेंज रोव्हर, डिफेंडर अशा गाड्या वापरतात. ज्या एक लिटरमध्ये फक्त ३ किलोमीटरच्या आसपास चालतात. प्रचाराची नौटंकी सोडली तर सत्ताधारी पक्षाकडून उधळपट्टी सुरू आहे.

राज्याचे मंत्री गिरीष महाजन यांनी या परिस्थितीस 'काळाबाजार' कारणीभूत असल्याचे सांगत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्यात तापी नदीपात्रात हजारो जेसीबी पोकलेन आणि डंपर दिवसरात्र वाळू उपसा आणि वाहतूक करत आहेत. त्यांना हे डिझेल कुठून मिळत आहे. काळ्या बाजारातून? काळ्या बाजारामुळे कृत्रिम टंचाई निर्माण होत असेल, तर ती रोखण्याची जबाबदारी सरकारची नाही का? साठेबाजी होत असेल तर प्रशासन काय करत होते? हे सर्व माफिया सत्ताधारी पक्षाच्या जवळचे आहेत. त्यामुळे त्यांना सरकारी आशीर्वादासोबत टंचाईच्या काळात डिझेलचा सुरळीत पुरवठाही सुरू आहे. हातात कॅन घेऊन दिवसभर पंपावर उभ्या असणाऱ्या शेतकऱ्यांना काळा बाजार करतात असे म्हणणाऱ्या गिरीष महाजनांच्या जिल्ह्यात तापी नदीतून अवैधपणे जी रेतीची लूट सुरू आहे त्यासाठी लागणारे डिझेल काळ्या मार्गाने येती की गोऱ्या मार्गाने यावर कधी चकार शब्द काढला नाही.

राज्यात सगळीकडे अवैध रेती उत्खनन करणारे डंपर, जेसीबी आणि पोकलेन मशीन दिवस-रात्र सुरू आहेत. त्यांना रोज हजारो लिटर डिझेल मिळत आहे. जर पुरवठा कमी असेल, तर हा इंधन पुरवठा कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे? अवैध रेती उत्खननाचा पर्यावरणावरही गंभीर परिणाम होत आहे. नदीपात्रांची मोठ्या प्रमाणावर हानी होत असून भूजल पातळी खालावत आहे. गावांचे नैसर्गिक संतुलन बिघडत आहे. तरीही प्रशासनाकडून कठोर कारवाई होताना दिसत नाही. डिझेल टंचाईच्या काळातही माफियांची यंत्रणा खंडित न होणे हे प्रशासनातील साटेलोट्याचेच निदर्शक आहे.

खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच डिझेलची कमतरता निर्माण होणे अत्यंत गंभीर आहे. महाराष्ट्रातील बहुतांश शेती यांत्रिकीकरणावर अवलंबून आहे. मशागत, पेरणी, सिंचन आणि वाहतूक या सर्व प्रक्रियांमध्ये डिझेल महत्त्वाची भूमिका बजावते. वेळेत मशागत झाली नाही तर पेरणी उशिरा होते आणि त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होतो. आधीच वाढत्या उत्पादन खर्चामुळे त्रस्त असलेला शेतकरी दुहेरी संकटात आहे. पंतप्रधानांनी 'खते कमी वापरा' असे आवाहन केले. बियाणे, खते, औषधे आणि इंधन यांच्या वाढत्या किमतींनी शेतकऱ्यांचे अर्थकारण कोलमडले आहे. त्यात हवामानातील अनिश्चितता आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे ग्रामीण भागातील अस्वस्थता वाढली आहे. बळीराजाचा गौरव फक्त सत्ताधाऱ्यांच्या भाषणांपुरता मर्यादित राहिला असून धोरणांच्या केंद्रस्थानी शेतकरी दिसत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

कांदा उत्पादक शेतकरी आधीच मोठ्या आर्थिक संकटात आहे. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारभाव कोसळले आहेत. अनेकांना कांदा रस्त्यावर फेकण्याची वेळ आली आहे. काही ठिकाणी दहा-दहा क्विंटल कांदा विकल्यानंतरही हातात १० रुपयेही पडत नाहीत. त्यात आता डिझेल टंचाईमुळे वाहतूक खर्च वाढला असून कृषिमाल बाजारात नेणेही कठीण बनले आहे.

सरकारचा आणखी एक गंभीर दोष म्हणजे पारदर्शकतेचा अभाव. पुरवठा विस्कळीत का झाला, परिस्थिती किती गंभीर आहे आणि ती पूर्ववत होण्यासाठी किती वेळ लागणार, याबाबत सरकार स्पष्ट बोलत नाही. परिणामी अफवा पसरून साठेबाजी वाढत आहे आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. लोकशाही व्यवस्थेत संकटाच्या काळात सरकारने जनतेशी प्रामाणिक संवाद साधणे अपेक्षित असते. परंतु येथे सरकारची भूमिका वास्तव नाकारण्याचीच भूमिका दिसते. दरम्यान, सरकारमधील नेते विधान परिषदेच्या राजकारणात आणि सत्तासमीकरणांत व्यस्त आहेत. कोणाला उमेदवारी द्यायची, कोणाला मंत्रिपद मिळणार यावर चर्चा सुरू असताना ग्रामीण महाराष्ट्र मात्र इंधन टंचाईच्या झळा सहन करत आहे. सामान्य माणसांच्या वेदनांकडे अजिबात लक्ष नाही.

# जननायक बिरसा मुंडा

आज ९ जून, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शक्षिा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शक्षिा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शक्षिा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले.

बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात.

नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# 'हलाल टॅक्स' हा हिंदूंच्या खिशातून वसूल केला जाणारा 'जिझिया करच'! – श्री. रमेश शिंदे, राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती



कोल्हापूर - कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ म्हणजेच 'गोकुळ'ने 'हलाल' प्रमाणपत्र घेतल्याचे समोर आले आहे. 'हलाल'प्रमाणपत्र देणारी 'जमियत उलेमा हिंद' ही संघटना ७०० हून अधिक आतंकवाद्यांचे खटले लढवते आणि हा पैसा जे प्रमाणपत्र घेतात त्यांच्या माध्यमातून गोळा करत आहे. सामान्य शेतकऱ्याला अंधारात ठेवून 'गोकुळ'चा पैसा 'हलाल'साठी वापरणे ही लाखो शेतकऱ्यांची फसवणूकच आहे ! वर्ष २०१३ मध्ये चालू झालेली हलाल अर्थव्यवस्था आज जागतिक स्तरावर २.१ अमेरिकन ट्रिलियन डॉलर्सपर्यंत (१७९.६ लाख कोटी रुपये) पोचली आहे. हिंदूंच्या खिशातून वसूल केला जाणारा 'हलाल टॅक्स' हा प्रत्यक्षात हिंदूंसाठी 'जिझिया कर'च आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला खिळखिळी करणारी 'हलाल अर्थव्यवस्था' मोडून काढणे आवश्यक असून त्यासाठी भारत देश 'हलाल'मुक्त झाला पाहिजे, असे ठाम प्रतिपादन हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांनी केले.

ते कोल्हापूर येथील पत्रकार परिषदेत बोलत होते. या प्रसंगी 'हिंदू एकता आंदोलना'चे श्री. गजानन गुरव, 'महाराजा प्रतिष्ठान'चे संस्थापक श्री. निरंजन शिंदे, 'मराठा तितुका मेळवावा'चे श्री. योगेश केरकर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख श्री. संभाजीराव भोकरे, हिंदु जनजागृती समितीचे श्री. शिवानंद स्वामी, शिवसेनेचे श्री. किशोर घाटगे, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे उपजिल्हाप्रमुख श्री. अशोक गुरव उपस्थित होते.

या वेळी श्री. रमेश शिंदे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य हे देशातील ५ व्या क्रमांकाचे दूध उत्पादक राज्य आहे.

राज्यात होणाऱ्या एकूण उत्पन्नाच्या २.५ दशलक्ष लिटर दुधाची कमतरता आपल्याला असून अशा स्थितीत आपल्याला दूध निर्यात करण्याची आवश्यकताच काय ? जगातील १९२ देशांनी जर 'भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण' () ला मान्यता दिली आहे, तर भारतात मात्र धर्मावर आधारीत 'हलाल' प्रमाणपत्राला आपण मान्यता का देतो ? 'भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण'ने जे एखाद्या पदार्थाच्या सर्व चाचण्या केल्यावर 'यात मांसाशी संबंधित कोणतेही पदार्थ नाही', असे सांगितले, तर त्यांच्यावर विश्वास न ठेवता आणखी एका 'हलाल' प्रमाणपत्राची आवश्यकता काय? प्रारंभी केवळ 'मांसापुरती' मर्यादित असलेले 'हलाल प्रमाणपत्र' दूध, तुलसी अर्क, साखर, 'डेटिंग ॲप', निवासी संकुल, शेअर बाजार यांपासून आज बहुतांश प्रत्येक जीवनोपयोगी उत्पादन 'हलाल प्रमाणित' आहे. हिंदू घेत असलेली जवळपास प्रत्येक वस्तू 'हलाल'असून हिंदूंच्या खिशातून जाणारा पैसा हा 'हलाल'साठी खर्च केला जातो. 'हलाल'मध्ये केवळ मुसलमानांच्या धार्मिकतेचा विचार केला असून यात हिंदूंसाठी पवित्र असलेली गोमातेच्या संदर्भातील कोणतेही उत्पादन वापरले जाणार नाही याची कोणतीही खात्री देत नाही, असेही श्री. शिंदे यांनी या वेळी सांगितले.

**श्री. सुनील घनवट,**
**राज्य संघटक, महाराष्ट्र व छत्तीसगड,**
**हिंदु जनजागृती समिती, (संपर्क : ७०२०३८३२६४)**

# पान १ व ४ वरुन....

## कदीम जालना...

माहितीची शहानिशा केल्यानंतर पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले.

रात्री सुमारे ३.४० वाजता दोन पंचांच्या उपस्थितीत मेरीट हॉटेलजवळ आणि रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचण्यात आला. यावेळी बातमीदाराने दिलेल्या वर्णनानुसार एक संशयित व्यक्ती इको कारमध्ये बसलेली आढळून आली. पोलिसांनी तात्काळ वेढा घालून त्याला ताब्यात घेतले.

**झडतीत एमडी (मेफेड्रोन) जप्त**

आरोपीची अंगझडती आणि वाहनाची तपासणी केली असता त्याच्याकडे मानवी शरीरासाठी अत्यंत घातक असलेला आणि अंमली पदार्थ नियंत्रण कायद्यांतर्गत प्रतिबंधित असलेला एमडी (मेफेड्रोन) आढळून आला.

पोलिसांनी दोन स्वतंत्र झिपलॉक पिशव्यांमध्ये ठेवलेला संशयित अंमली पदार्थ जप्त केला. प्राथमिक तपासणीत हा पदार्थ एमडी असल्याचे निष्पन्न झाले असून त्याचे नमुने प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत.

कारवाईदरम्यान पोलिसांनी खालील मुद्देमाल जप्त केला : यात १.०५ ग्रॅम वजनाचा एमडीसदृश पदार्थ किंमत ₹१५,७५०, १.५६ ग्रॅम वजनाचा एमडीसदृश पदार्थ किंमत ₹२३,४००, मारुती सुझुकी इको कार (-४८--९३३२) किंमत ₹४,००,०००, रेडमी ११ मोबाईल किंमत ₹१०,०००, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा किंमत ₹१,०००, २० रिकाम्या झिपलॉक प्लास्टिक पिशव्या असा एकूण जप्त मुद्देमाल ₹४,५०,१५०.

पोलिसांच्या हाती लागलेल्या झिपलॉक पिशव्या, वजनकाटा आणि वाहनाच्या आधारे आरोपी केवळ सेवनासाठी नव्हे तर अंमली पदार्थांच्या विक्री आणि वितरण साखळीशी संबंधित असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आरोपीकडून हा माल कोठून आणला गेला, तो कोणाला विकला जाणार होता आणि त्याच्या संपर्कात आणखी कोण आहेत याचा तपास सुरू आहे.

या प्रकरणामुळे जालना आणि परिसरात कार्यरत असलेल्या अंमली पदार्थांच्या नेटवर्कचा तपास अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल

या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम ( ), १९८५ अंतर्गत कलम ८ (क) आणि संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक दिनकर मोरे तसेच कदीम जालना पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या धाडसी कारवाईत सहभाग घेतला. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिनकर मोरे करीत आहेत.

## जालना जलकवच अभियान...

जलसंधारणाची कामे हाती घ्यावीत.

**पाणी कार्यक्षम शेती**

कृषी विभागाने शेतकऱ्यांना कमी पाणी लागणाऱ्या पिकांविषयी मार्गदर्शन करावे. सूक्ष्म सिंचन, पीक विविधीकरण व पाणी बचतीच्या तंत्रज्ञानाचा प्रसार करावा.

**जनजागृती अभियान**

ग्रामसभा, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था व महिला बचत गटांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करावी.

**विभागीय समन्वय**

महसूल, ग्रामविकास, कृषी, जलसंपदा, भूजल सर्वेक्षण व पाणीपुरवठा विभागांनी समन्वयाने काम करून नियमित प्रगती अहवाल सादर करावेत.

**अधिकाऱ्यांसाठी जबाबदाऱ्या**

उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पाणीस्थितीचा नियमित आढावा घेऊन आवश्यक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत स्तरावर अभियानातील सर्व उपक्रमांची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

संबंधित विभागांनी निश्चित कालमर्यादेत कामांची पूर्तता करून प्रगती अहवाल सादर करावेत.

**जिल्हाधिकाऱ्यांचा संदेश**

''पाणी ही सामूहिक जबाबदारी आहे. जलव्यवस्थापन, पाण्याचा काटकसरीने वापर आणि ग्रामस्तरावरील सक्रिय सहभाग यांच्या माध्यमातून संभाव्य पाणीटंचाईच्या परिस्थितीवर प्रभावी मात करता येईल. सर्व विभागांनी व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी अभियानाला सर्वोच्च प्राधान्य देऊन तात्काळ कार्यवाही करावी,'' असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

## अनुसूचित जातींच...

दाखल केली नाही व सामाजिक कार्यकर्त्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे त्यांच्यावर अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी.

८) पोलीस निरीक्षक संतोष साबळे यांनी अनुसूचित जातीच्या लोकांवर खोटे गुन्हे दाखल केले असून सामाजिक कार्यकर्त्यांना मारहाण केल्याच्या तक्रारीवरून त्यांना निलंबित करण्यात यावे, तसेच त्यांच्या हद्दीतील भूमाफिया व अवैध धंद्यांची चौकशी करून कारवाई व्हावी.

९) जालना शहरातील महापुरुषांच्या स्मारके, पुतळे व स्मृतिस्थळांच्या परिसरातील दारू दुकाने व अवैध धंदे तत्काळ बंद करण्यात यावेत.

१०) माळीपुरा, जालना येथील डॉ. अण्णाभाऊ साठे शॉपिंग सेंटरचे नव्याने बांधकाम करण्यात यावे.

११) जालना जिल्ह्यातील मातंग समाजाच्या स्मशानभूमींचा सर्वे करून अतिक्रमणे हटवावीत, अधिकृत नोंद करावी व त्यांचे सुशोभीकरण करण्यात यावे.

१२) जालना महानगरपालिका हद्दीतील सर्वे नंबर २६५ अ मातंग समाजासाठी शासनाने राखीव ठेवलेली दफनभूमी (आरक्षण क्रमांक २६५ ब) ही महानगरपालिकेने हस्तांतरण करून त्या ठिकाणी संरक्षण भिंत बांधून सुशोभीकरण करावे.

१३) जालना मातंग समाज शिष्टमंडळास उपवर्गीकरण व इतर मागण्यांसाठी मुख्यमंत्र्यांनी वेळ द्यावा.

या सर्व मागण्या मातंग समाजाच्या अस्तित्व, सन्मान, सुरक्षा, सामाजिक न्याय आणि सर्वांगीण विकासाशी निगडित आहेत. शासनाने यावर तत्काळ सकारात्मक निर्णय घेऊन कार्यवाही करावी, अन्यथा मातंग समाज आपल्या घटनात्मक व लोकशाही हक्कांच्या संरक्षणासाठी राज्यव्यापी आंदोलन अधिक तीव्र करण्यास बाध्य राहील, असा इशारा मातंग समाज आरक्षण कृती समिती, जालना जिल्हा यांच्या वतीने देण्यात आला आहे.

## पत्नी मानद मोलकरीण...

आणि समानतेच्या दृष्टीकोनातून पाहण्यासाठी मार्गदर्शक ठरेल. यामुळे महिलांना केवळ गृहिणी म्हणून पाहण्याच्या सामाजिक मानसिकतेलाही चाप बसेल.''

न्यायमूर्ती देशपांडे यांनी लिहिलेल्या या निकालात असेही नमूद केले आहे की, पती-पत्नीच्या अल्प सहवासाच्या पार्श्वभूमीवर हे आरोप करण्यात आले आहेत. त्यामुळे, पत्नीचे घरगुती कामातील आणि स्वयंपाकातील अननुभवी असणे आणि सततची किरकिर ही क्रूरता आहे की नाही, हा प्रश्न निर्माण होतो. न्यायालयाने हे स्पष्ट केले की, लग्नाच्या सुरुवातीच्या काळात अशा घटना सामान्य असतात आणि केवळ या वर्तनाला क्रूरता मानता येणार नाही.

या निरीक्षणांसह, खंडपीठाने कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय रद्द केला. इतकेच नव्हे, तर पतीला पत्नीला दरमहा प्रत्येकी १०,००० रुपये देखभाल खर्च आणि १०,००० रुपये घरभाड्यापोटी देण्याचे आदेश दिले. या प्रकरणात, कायदेशीर मदतीद्वारे ॲडव्होकेट अदिती नायकरे यांनी पत्नीची बाजू मांडली, तर ॲडव्होकेट वैभव जगदाळे यांनी पतीचे प्रतिनिधित्व केले. (खटल्याचे शीर्षक: केबीसी विरुद्ध बीएससी (फॅमिली कोर्ट अपील १५९ ऑफ २०१०)).

# विज्ञानाशी सुसंगत असेल तेच बुद्धाचे तत्त्वज्ञान समजावे : बी. बी. मेश्राम

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १७४ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ''अस्पृश्यांना बौद्ध धर्माशिवाय दुसरा कोणताही अभ्युदयाचा मार्ग नाही.'' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक विधानावर आधारित १७४ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेच्या साकेतनगर येथील कार्यालयात ७ जून २०२६ ला उत्साहात संपन्न झाली.



कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, २५ मे ते ६ जून १९५० या कालावधीत सिलोन बुद्धिस्ट काँग्रेसद्वारे आयोजित जागतिक बुद्ध परिषदेत भारताचे प्रतिनिधी म्हणून तत्कालीन कायदामंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहभागी झाले होते. या परिषदेत त्यांनी बौद्ध धर्माचा इतिहास, त्याचा अस्त व उदय, नैतिक मूल्यांचे महत्त्व, ब्राह्मणी धर्माला बौद्ध धर्माने दिलेले आव्हान तसेच अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी बौद्ध धर्माचे अनन्यसाधारण महत्त्व याविषयी सखोल विवेचन केले होते.

बी. बी. मेश्राम पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बौद्ध धर्मावरील विचार समजून घेण्यासाठी पी. लक्ष्मी नरसू लिखित ''इसेन्स ऑफ बुद्धिझम'' या ग्रंथाला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना अभ्यासणे आवश्यक आहे. बुद्धत्वाचे आचरण करताना एखादी बाब विज्ञानाशी सुसंगत आहे की नाही, याची चिकित्सक तपासणी केली पाहिजे. जे विज्ञाननिष्ठ व तर्कसंगत आहे, तेच बुद्धाचे खरे तत्त्वज्ञान समजावे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना ॲड. राहुल गायकवाड यांनी जातीव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी समाजात आंतरजातीय विवाहांना विरोध करण्यात आला आणि त्यातून अनेक सामाजिक अनिष्ट प्रथा उदयास आल्या, असे सांगितले. समाजात परस्पर स्नेह, समता व मानवता वृद्धिंगत करणारे आचरण प्रत्येकाने स्वीकारले पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादन केले. प्रमुख वक्त्या डॉ. कल्पना गंगावणे यांनी बुद्धांचे व्यक्तिमत्त्व इतर धर्मसंस्थापकांपेक्षा कसे वेगळे होते? हे समजून घेण्याची आवश्यकता व्यक्त केली.

''अत्त दीप भव'' या तत्त्वानुसार ध्यान साधना व आत्मपरिष्कार केल्यास बुद्धत्वाकडे वाटचाल करता येते, असे त्या म्हणाल्या. समाजातील नेतृत्वाच्या अभावाकडे लक्ष वेधत त्यांनी प्रत्येकाने नियमितपणे बुद्ध विहारात जाऊन सामाजिक व वैचारिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन केले.

यावेळी समन्वयक उद्योजक शशिकांत काळे यांनी बौद्ध धर्माचे आचरण आणि सामाजिक ऐक्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. उपवर्गीकरणाच्या पार्श्वभूमीवर विविध घटकांमध्ये वाढणारी द्वेषभावना समाजहितासाठी घातक असल्याचे त्यांनी नमूद केले. राज गायकवाड यांनी समाजातील पाखंडवाद नष्ट करण्यासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. अर्चित मेश्राम यांनी अधिक अभ्यासपूर्वक विचार मांडण्याचा संकल्प व्यक्त केला. ॲड. डी. बी. मेश्राम यांनी विनयपिटक, सुत्तपिटक व अभिधम्मपिटक यांच्या अभ्यासातील विसंगती दूर करण्याची गरज व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक उद्योजक प्रा. विलास कटारे यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके यांनी तर आभार प्रदर्शन उद्योजक शशिकांत काळे यांनी केले.

कार्यशाळेस विविध क्षेत्रांतील अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बी. बी. मेश्राम,**
**(संचालक : फुले शाहू आंबेडक राईट स्टडी फाउंडेशन), छत्रपती संभाजीनगर.**
**संपर्क : ८९८३०८२१२८ / ९४२१६७८६२८.**

# झिरो टॉलरन्सची मुंढे स्टाईल

महाराष्ट्रात अन्नपदार्थांमधील भेसळ हा दिवसेंदिवस गंभीर होत चाललेला विषय आहे.दूध,तूप,पनीर, खाद्यतेल, मसाले, मिठाई, बिस्किटे, पेये आणि अगदी औषधांपर्यंत अनेक वस्तूंमध्ये भेसळ होत असल्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत.अशा परिस्थितीत नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे () आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर भेसळखोरांविरोधात धडक मोहीम सुरू केली आहे.त्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे भेसळ करणाऱ्या टोळ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे.भेसळ हा केवळ कायद्याचा भंग नसून तो जनतेच्या आरोग्यावर होणारा थेट हल्ला आहे.नफेखोरीच्या हव्यासापोटी काही व्यापारी आणि उत्पादक नागरिकांच्या जीवाशी खेळत आहेत.निकृष्ट दर्जाचे तेल,कृत्रिम रसायने वापरून तयार केलेले दूध,बनावट पनीर,रंग मिसळलेले मसाले आणि कालबाह्य पदार्थ नव्याने पॅक करून विकण्याचे प्रकार अनेकदा उघडकीस आले आहेत.यामुळे पचनाचे विकार,यकृताचे आजार,कर्करोग आणि इतर गंभीर आरोग्य समस्या निर्माण होण्याचा धोका वाढतो.तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाची यंत्रणा अधिक सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे.राज्यातील विविध शहरांमध्ये आणि ग्रामीण भागांमध्ये अचानक छापे टाकून भेसळयुक्त पदार्थांचा साठा जप्त करण्यात येत आहे.अनेक कारखाने,गोदामे आणि दुकाने तपासण्यात आली असून लाखो रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.राज्यभर अन्न व औषध प्रशासन विभागाने गुटखा,पानमसाला विक्रेत्यांविरोधात दोन दिवसात चाळीस ठिकाणी छापेमारी करून कारवाई केली आहे.तसेच फसव्या जाहिराती करणाऱ्या सेलिब्रिटी यांना देखील मुंढे यांनी कडक ईशारा दिला आहे.अनेक ठिकाणी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात येत आहे.त्यामुळे कायद्याचा धाक निर्माण होण्यास मदत होत आहे.विशेष म्हणजे ही मोहीम केवळ मोठ्या उद्योगांपुरती मर्यादित नसून सर्व स्तरांवरील अन्नव्यवसायिकांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.रस्त्यावरील खाद्यपदार्थ अगदी वडापाव विक्रेत्यांपासून मोठ्या उत्पादक कंपन्यांपर्यंत सर्वांची तपासणी केली जात आहे.अन्नसुरक्षेच्या नियमांचे पालन होत आहे की नाही,याची काटेकोरपणे पडताळणी केली जात आहे.नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्न मिळावे,हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.भेसळ रोखण्यासाठी केवळ प्रशासनाची कारवाई पुरेशी नाही.यासाठी ग्राहकांनी देखील जागरूक होणे आवश्यक आहे.वस्तू खरेदी करताना उत्पादनाची तारीख,गुणवत्ता चिन्हे,परवाना क्रमांक आणि पॅकिंगची माहिती तपासणे गरजेचे आहे.संशयास्पद पदार्थ आढळल्यास त्याची तक्रार अन्न व औषध प्रशासनाकडे करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.नागरिकांचा सहभाग वाढल्यास भेसळखोरांना रोखणे अधिक सोपे होईल.याशिवाय फार्मासिस्ट नसलेली मेडिकल दुकाने सील करा असे कडक आदेश तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत.आज महाराष्ट्रासमोर आरोग्यदायी समाज घडविण्याचे मोठे आव्हान आहे.त्यासाठी अन्नसुरक्षा ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली भेसळविरोधी मोहीम ही जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आणि स्वागतार्ह पाऊल आहे.या मोहिमेमुळे भेसळखोरांवर अंकुश बसण्यास मदत होईल,तसेच अन्न व्यवसायात प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता वाढेल.भेसळमुक्त महाराष्ट्र हे केवळ प्रशासनाचे ध्येय नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.शासनाची कठोर भूमिका,प्रशासनाची कार्यक्षमता आणि नागरिकांची जागरूकता यांचा संगम साधला तरच खऱ्या अर्थाने भेसळमुक्त महाराष्ट्राची निर्मिती होऊ शकेल.तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेली ही मोहीम त्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण आणि आशादायी पाऊल मानावे लागेल.



**केतन द. भोज, मुंबई**
**सदस्य मराठी वृत्तपत्र लेखक संघ,मुंबई**

# मोदी सरकारची तपपूर्ती : विश्वास, विकास आणि लोककल्याणाची अन विकसित भारताच्या संकल्पाची

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने राष्ट्रनिर्मितीची १२ वर्षे पूर्ण केली आहेत. शिवाय पंडित नेहरू यांच्या पेक्षा जास्त दिवस म्हणजे सर्वाधिक काळ पंतप्रधान पदावर राहण्याचा विक्रम मोदींच्या नावावर ९ जूनला होते आहे. मोदी सरकारची एका तपाची वाटचाल ही केवळ राजकीय सत्तेची कहाणी नाही. ही बारा वर्षे म्हणजे भारताने स्वतःला नव्याने शोधण्याची कथा आहे. भारताला आर्थिक महासत्ता बनवण्याइतकेच सुसंस्कृत, शिस्तबद्ध, शिक्षित आणि एकात्म राष्ट्र बनवणे आवश्यक आहे. बारा वर्षांत पंतप्रधान मोदींनी आत्मविश्वासाचे जे बीज रोवले आहे, त्याचे विशाल वटवृक्षात रूपांतर करणे ही पुढील पिढ्यांची जबाबदारी असेल. कारण हा केवळ एका सरकारचा प्रवास नसून तो भारताने स्वतःला नव्याने ओळखण्याचा, आपल्या सामर्थ्याची जाणीव करून घेण्याचा आणि जागतिक स्तरावर नव्या आत्मविश्वासाने उभे राहण्याचा प्रवास आहे. सब का साथ, सब का विकास, सब का विश्वास, सबका प्रयास' ही संकल्पना शासनाच्या केंद्रस्थानी आली. नरेंद्र मोदी यांनी भारतीयांना स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवायला शिकवले. भारत हा केवळ मोठी बाजारपेठ नाही, तर जगाला दिशा देऊ शकणारे प्राचीन पण आधुनिक राष्ट्र आहे, ही भावना समाजात दृढ झाली. या तपपूर्ती काळात देशाने डिजिटल क्रांती, पायाभूत सुविधांचा विकास, आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढलेले स्थान आणि आत्मनिर्भर भारतच्या दिशेने मोठी ऐतिहासिक झेप घेतली आहे. भारतीय संस्कृतीत १२ वर्षांचा कालावधी म्हणजे एक तप मानला जातो. २६ मे २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांदा देशाच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. तेव्हापासून आजतागायत देशाच्या राजकारणात, अर्थकारणात आणि सामाजिक जीवनात झालेले बदल अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहेत. आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या सक्षम आणि दूरदर्शी नेतृत्वाखालील केंद्र सरकारची यशस्वी १२ वर्षे पूर्ण होत आहेत. या १२ वर्षांत मोदी सरकारचे ध्येय राष्ट्र उभारणी हे राहिले आहे. आज आपण निर्माण केलेली नवी अर्थव्यवस्था, नवा भारत आणि नवा आत्मविश्वास हे संपूर्ण जगासाठी एक उदाहरण बनले आहे. २०१४ ते २०२६ पर्यंतचा आपला १२ वर्षांचा प्रवास हा सातत्यपूर्ण प्रगतीचा राहिला आहे.मजबूत, समृद्ध आणि सुरक्षित भारता साठीची आपला संकल्प आता पूर्णपणे साकार होत आहे. आपले यशस्वी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी स्पष्टपणे सांगतात की, 'विकास हे आमच्यासाठी २४ तास, ७ दिवस १२ महिन्यांचे ध्येय आहे.' आज आपली कार्यसंस्कृती बदलली आहे. आता, ज्याचा आम्ही शिलान्यास ठेवतो, त्याचे उद्घाटनही करतो. खऱ्या अर्थाने मोदी सरकारची ही १२ वर्षे ही विश्वास, विकास आणि लोककल्याणाची सुवर्ण वर्षे आहेत, ज्यांनी भारताचे प्रतिमा बदलली आहे. गेल्या १२ वर्षांत आपण सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास हा मंत्र* केवळ कागदावरच नव्हे तर काँक्रीट, स्टील, ऑप्टिकल फायबर आणि कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणुकीच्या रूपात जमिनीवर प्रत्यक्षात उतरलेला पाहिला आहे. २००० साली आदरणीय अटलबिहारी वाजपेयी यांनी घातलेल्या प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेच्या दूरदर्शी पायाने ग्रामीण भारताचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलून टाकला आहे. तुम्हाला हे जाणून अभिमान वाटेल की तेव्हापासून गावांमध्ये जवळपास ८ लाख किलोमीटरचे पक्के रस्ते बांधण्यात आले आहेत, त्यापैकी सुमारे ४ लाख किलोमीटरचे रस्ते केवळ गेल्या १२ वर्षांतच बांधण्यात आले आहेत. या रस्त्यांमुळे आपल्या गरीब बंधू आणि भगिनींच्या जीवनात विकासाची एक नवी पहाट आणली आहे. पूर्वी गावातून शहरात जायला ८ तास लागायचे, आज त्याच प्रवासाला फक्त ३ तास लागतात. शेतकरी आता आपला कष्टाने कमावलेला शेतमाल मोठ्या बाजारपेठांमध्ये सहजपणे पोहोचवू शकतात. मुले, विशेषतः मुली सुरक्षितपणे शाळेत जाऊ शकतात आणि आपत्कालीन परिस्थितीत रुग्णालयांमध्ये जाणे सोपे झाले आहे. अटलजींची हा संकल्प ग्रामीण गरीब आणि गरजूंच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणाचे सर्वात मोठे साधन बनली आहे, जी त्यांना थेट देशाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात जोडते. भाजप सरकारने नेहमीच अन्नदात्याला - शेतकऱ्यांना आपल्या धोरणांच्या केंद्रस्थानी ठेवले आहे. गेल्या १२ वर्षांत भारताने अन्नधान्य उत्पादनात ऐतिहासिक वाढ नोंदवली आहे. देशाचे अन्नधान्य उत्पादन ७१ टक्क्यांची सर्वात मोठी ऐतिहासिक वाढ अनुभवत आहे. आज देशाच्या अन्नधान्य उत्पादनाने १२ हजार लाख मेट्रिक




टनांचा विक्रमी उच्चांक ओलांडला आहे. ही केवळ एक आकडेवारी नाही; हा याचा पुरावा आहे की, आजचा भारत केवळ आपली अन्नसुरक्षाच सुनिश्चित करत नाही, तर आपला अन्नदाता (अन्न पुरवठादार) पूर्वीपेक्षा अधिक सक्षम आणि आत्मनिर्भर झाला आहे. आज, भारत जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश आहे. गेल्या दशकात दूध उत्पादनात तब्बल ६९.४% वाढ झाली असून, ते २०१४-१५ मधील १४६.३० दशलक्ष टनांवरून २०२४-२५ मध्ये २४७ दशलक्ष टनांपेक्षा अधिक झाले आहे. कृषी क्षेत्रातील सर्वात मोठा बदल सिंचन क्षेत्रात झाला आहे. आपल्या सरकारचा विश्वास आहे की शेतजमिनीसाठी पाण्याची उपलब्धता ही शेतकऱ्याची सर्वात महत्त्वाची गरज आहे. २०१४ पूर्वी देशातील सिंचनाची व्याप्ती मर्यादित होती आणि पाण्याच्या वापराची कार्यक्षमता अत्यंत कमी होती. मात्र, मोदी सरकारच्या दूरदर्शी धोरणांनी एक ऐतिहासिक बदल घडवून आणला आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या प्रत्येक थेंबातून अधिक पीक या मोहिमेअंतर्गत, २०१५-१६ पासून १०९ लाख हेक्टरपेक्षा जास्त शेतजमीन सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यात आली आहे. यामुळे केवळ पाण्याची लक्षणीय बचत झाली नाही, तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात आणि उत्पादनातही अभूतपूर्व वाढ झाली आहे. २०१४ मध्ये देशात एकूण ९१,२८७ किलोमीटर लांबीचे राष्ट्रीय महामार्ग होते. आज हे जाळे १.४६ लाख किलोमीटरहून अधिक झाले आहे. २०१४ मध्ये दररोज केवळ ११.६ किलोमीटरचे बांधकाम होत होते, तर आज दररोज ३४ किलोमीटरहून अधिक नवीन महामार्ग बांधले जात आहेत. मोदी सरकारने अगदी दुर्गम भागांपर्यंतही विकासाचा प्रवाह पोहोचवला आहे. चिनाब पूल, नवीन पंबन पूल आणि अटल टनेल यांसारख्या शेकडो भव्य आणि विशाल पायाभूत सुविधा प्रकल्पांनी देशाच्या प्रगतीला गती दिली आहे. २०१४ पर्यंत रेल्वेचे आधुनिकीकरण हे केवळ एक स्वप्न होते. आज भारतीय रेल्वेच्या ब्रॉडगेज विद्युतीकरणाचे ९९.६% पेक्षा जास्त काम पूर्ण झाले आहे. 'अमृत भारत स्टेशन योजने'अंतर्गत देशभरातील १,३३७ हून अधिक रेल्वे स्थानकांना जागतिक दर्जाच्या मानकांनुसार अद्ययावत केले जात आहे.भारतीय रेल्वेने या १२ वर्षांत साधलेला विकासाचा वेग अकल्पनीय आहे. भारतीय रेल्वे विभाग केवळ गाड्या चालवत नाही. उलट, आरआरटीएस आणि वंदे भारत ट्रेन्सच्या माध्यमातून आम्ही देशभरात जागतिक दर्जाची मल्टीमोडल कनेक्टिव्हिटी निर्माण केली आहे, ज्यामुळे वाहतुकीच्या सर्व प्रकारांसाठी अखंड कनेक्टिव्हिटी निश्चित झाली आहे. आज, देशाच्या कानाकोपऱ्यात १६४ हून अधिक वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेन यशस्वीपणे धावत असून, त्या भारतीय रेल्वेची एक नवीन, आधुनिक आणि सुरक्षित ओळख बनत आहेत. २०१४ मध्ये केवळ ५ शहरांमध्ये २४८ किमीचे मेट्रो नेटवर्क होते. आज भारतात २६ हून अधिक शहरांमध्ये १,०९५ किमी पेक्षा जास्त लांबीचे मेट्रो नेटवर्क आहे, ज्यामुळे ती जगातील सर्वात वेगाने वाढणारी शहरी वाहतूक व्यवस्था बनली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ६७ वर्षांत देशात केवळ ७४ विमानतळे होती. ९० हून अधिक नवीन विमानतळे बांधून एकूण संख्या १६४ वर आणली आहे. भारत जगातील तिसरी सर्वात मोठी देशांतर्गत हवाई प्रवास बाजारपेठ बनला आहे. उडान योजनेने पायात स्लीपर घालणाऱ्यांनाही हवाई प्रवासाची संधी दिली आहे. 'तंत्रज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचेल' हा मोदी सरकारचा आणखी एक प्रमुख मंत्र राहिला आहे. आज, राहणीमानातील सुलभता आणि डिजिटल क्रांतीने सर्वसामान्यांचे जीवन अधिक सुकर केले आहे. व्यवसाय सुलभता निर्देशांकात आपल्या क्रमवारीत १४२ व्या स्थानावरून ६३ व्या स्थानावर झेप घेतली आहे. प्रधानमंत्री ग्रामीण डिजिटल साक्षरता अभियानांतर्गत आपल्या देशातील ६ कोटींहून अधिक लोक डिजिटल साक्षर झाले आहेत.

एक राष्ट्र, एक बाजारपेठ या वचनबद्धतेमुळे २०२४-२५ मध्ये जीएसटी संकलन २२ लाख कोटी रुपयांच्या पुढे गेले आहे. प्रगती प्लॅटफॉर्म आणि फेसलेस टॅक्स सिस्टीम ने पारदर्शकता वाढवली आहे, आणि आमच्या जॅम ट्रिनिटीच्या माध्यमातून ५१ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम थेट गरिबांच्या बँक खात्यांमध्ये हस्तांतरित करण्यात आली आहे. तसेच, भारतनेट प्रकल्पांतर्गत देशातील २.१४ लाखांहून अधिक ग्रामपंचायतींना ऑप्टिकल फायबर नेटवर्कने जोडण्यात आले आहे, ज्यामुळे ग्रामीण भारतातील डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि सेवांचा वेगाने विस्तार झाला आहे. एकेकाळी विकासाच्या प्रतीक्षेत असलेला ईशान्य भारत आता आमच्या आणि दिल्लीच्याही जवळचा झाला आहे. खुद्द पंतप्रधानांनी ईशान्य भारताला ८३ हून अधिक दौरे केले आहेत. आज, ईशान्य भारतातील आठ राज्ये आमची अष्टलक्ष्मी आहेत, ज्यांची अर्थव्यवस्था तिप्पट वाढली आहे. अरुणाचल प्रदेश, मेघालय, नागालँड, त्रिपुरा आणि मिझोराममध्ये १००% रेल्वे विद्युतीकरण झाले आहे. स्वातंत्र्यानंतर प्रथमच सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेशला हवाई संपर्क मिळाला आहे.

मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या सुवर्ण प्रवासात ''राष्ट्र प्रथम'' ही आमची सर्वात मोठी वचनबद्धता राहिली आहे. आज भारताच्या परराष्ट्र धोरणाने जागतिक स्तरावर एक नवी ओळख निर्माण केली आहे. डिजिटल पेमेंट बाबतीत भारत जगात आघाडीवर आहे. गेल्या १२ वर्षांत आपल्या व्यवहारांमध्ये ऐतिहासिक १२,००० पटींची वाढ झाली आहे. आज आपण अभिमानाने सांगू शकतो की, आपल्या देशाने ३१४ लाख कोटी रुपयांचे अभूतपूर्व डिजिटल व्यवहार पाहिले आहेत, ज्यामुळे आपली अर्थव्यवस्था पारदर्शक झाली आहे आणि तिला एक नवी चालना मिळाली आहे. २०१४ मध्ये, आपली अर्थव्यवस्था जगातील पाच सर्वात कमकुवत अर्थव्यवस्थांपैकी एक होती. आज, भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे आणि चालू आर्थिक वर्षात ७% पेक्षा जास्त विकास दरासह आपण लवकरच जगातील तिसरी सर्वात मोठी आर्थिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर आहोत. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे सरकार केवळ कागदावर योजना बनवत नाही, तर त्यांच्या अंमलबजावणीसाठी तिजोरीसुद्धा उघडते. २०१४ पूर्वी पायाभूत सुविधांवरील खर्च केवळ २ लाख कोटी रुपये होता. मोदी सरकारने हा खर्च सहा पटींनी वाढवून आज १२.२ लाख कोटी रुपयांपर्यंत नेला आहे. आज भारत एक आर्थिक महासत्ता म्हणून मजबूतपणे उदयास येत आहे. भारताची अर्थव्यवस्था (जीडीपी) २०२५-२६ मध्ये ३४५ लाख कोटी रुपयांचा प्रचंड आकडा ओलांडेल. आपल्या अर्थव्यवस्थेची ताकद यावरून लक्षात येते की, आज आपला परकीय चलन साठा अंदाजे ६७ लाख कोटी रुपयांच्या ऐतिहासिक पातळीवर पोहोचला आहे, जो आपल्या ११ महिन्यांच्या आयातीचा खर्च पूर्णपणे भागवण्यासाठी पुरेसा आहे. देशातील जनतेचा पंतप्रधान मोदींच्या धोरणांवर अढळ विश्वास आहे. हे आपल्या कर संकलनातून स्पष्टपणे दिसून येते. २०२४-२५ मध्ये आपले प्रत्यक्ष कर संकलन २७ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचले, जे सरकारवरील प्रामाणिक करदात्यांच्या विश्वासाचे प्रतीक आहे. उत्पादन-संलग्न प्रोत्साहन योजनेने उत्पादन क्षेत्रासाठी आश्चर्यकारक काम केले असून, उत्पादन आणि रोजगाराला चालना दिली आहे. या योजनेअंतर्गत मार्च २०२६ पर्यंत २० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त विक्रमी विक्री साध्य केली जात आहे. या पीएलआय योजनेचे सर्वात मोठे यश हे आहे की, या योजनेने आपल्या देशातील तरुणांसाठी १२ लाखांहून अधिक नवीन रोजगार निर्माण केले आहेत ज्यामुळे लाखो कुटुंबांच्या घरात समृद्धी आली आहे.

गेल्या दशकात मेक इन इंडिया उपक्रम आणि उत्पादन-संबंधित उपक्रमांसारख्या धाडसी सुधारणा आणि दूरदर्शी धोरणांनी देशाला जागतिक उत्पादन केंद्रामध्ये रूपांतरित केले आहे. भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन २०१४-१५ मधील १.९ लाख कोटी रुपयांवरून २०२४-२५ मध्ये ११.३ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे, जी जवळपास सहा पटींची वाढ आहे. जो भारत आपल्या तंत्रज्ञानाच्या गरजांसाठी पूर्णपणे परदेशी देशांवर अवलंबून होता. तो देश पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे सेमीकंडक्टर उत्पादनाचे एक प्रमुख जागतिक केंद्र बनत आहे. देशात सेमीकंडक्टर उत्पादन परिसंस्था स्थापन करण्यासाठी, सरकारने सुमारे १.६४ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या वचनबद्धतेसह १२ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. हे महत्त्वपूर्ण प्रकल्प भारतात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष उच्च-तंत्रज्ञान रोजगार निर्माण करत आहेत. आता, मेड इन इंडिया चिप्स जगाला ऊर्जा देतील.

आज भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा मोबाईल फोन उत्पादक देश आहे. जो देश मोबाईल फोन आयात करत होता त्याच्या निर्यातीत १६३ पटींनी वाढ झाली आहे. मेक इन इंडियाचा परिणाम आहे की, आज देशात ३०० हून अधिक उत्पादन युनिट्स कार्यरत आहेत. मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात भारताच्या संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण स्थित्यंतर झाले आहे, ज्यामुळे भारत शस्त्रास्त्रांचा आयातदार देश न राहता एक प्रमुख उत्पादक आणि निर्यातदार देश बनला आहे. देशाला संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भर बनवण्यासाठी, उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये दोन भव्य संरक्षण औद्योगिक कॉरिडॉर स्थापन करण्यात आले आहेत, जिथे स्वदेशी शस्त्रास्त्रांचे उत्पादन केले जात आहे. या १२ वर्षांमध्ये भारताची किमान ६५% संरक्षण उपकरणे आता स्वदेशी बनावटीची आहेत. आज, आपल्या संरक्षण निर्यातीने ३८,४०० कोटी रुपयांचा ऐतिहासिक आकडा ओलांडला आहे. आज, जगभरातील १०० हून अधिक देश भारताची स्वदेशी शस्त्रे खरेदी करत आहेत.

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीच्या विचारांमुळे, स्टार्टअप इंडिया सारख्या मोहिमांमुळे आणि त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच आज देशभरात स्टार्टअप संस्कृतीला अभूतपूर्व चालना मिळत आहे. एक काळ असा होता की, २०१४ साली देशभरात केवळ ५०० स्टार्टअप्स आणि चार युनिकॉर्न होते. आज पंतप्रधानांच्या खंबीर आणि प्रेरणादायी नेतृत्वाखाली हा आकडा अनेक पटींनी वाढून २.०६ लाख स्टार्टअप्स आणि १२० युनिकॉर्नपर्यंत पोहोचला आहे.

पर्यावरण संरक्षण आणि विकास यांचा समतोल साधत भारताने जीवाश्म-इंधनविरहित स्रोतांपासून ५०% वीजनिर्मितीचे आपले लक्ष्य निर्धारित वेळेच्या पाच वर्षे आधीच साध्य केले आहे. भारतात आजपर्यंत जीवाश्म-इंधनविरहित स्रोतांपासून एकूण २८३.४६ गिगावॅट स्थापित क्षमता उभारण्यात आली आहे. स्थापित नवीकरणीय ऊर्जा क्षमतेमध्ये भारताचा जागतिक स्तरावर तिसरा क्रमांक लागतो. 'विकास तसेच वारसा' या मंत्राचे पालन करत आपले पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी गेल्या १२ वर्षांत भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभवाचे अभूतपूर्व पुनरुज्जीवन घडवून आणले आहे. ५०० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अयोध्येत भगवान श्रीरामांचे एक भव्य आणि दिव्य मंदिर उभारण्यात आले आहे. काशी विश्वनाथ कॉरिडॉरचे बांधकाम उज्जैनमधील श्री महाकाल लोकचे निर्माण आणि केदारनाथ धाम ची भव्य पुनर्बांधणी ही लाखो भारतीयांच्या श्रद्धेचा सन्मान करतात. गेल्या १२ वर्षांत आम्ही बुद्ध सर्किट आणि राम सर्किट चा वेगाने विकास केला आहे आणि प्रसाद योजनेअंतर्गत तीर्थक्षेत्रांच्या पुनरुज्जीवनासाठी १,७०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च केला जात आहे.

२०१४ मध्ये सुरू झालेला विकास आणि विश्वासाचा हा प्रवास थांबवता येणार नाही. आमच्या १२ वर्षांच्या सेवेने आणि सुशासनाने देशातील प्रत्येक गरीब व्यक्ती, शेतकरी, तरुण आणि महिलेच्या जीवनात अभूतपूर्व बदल घडवून आणला आहे. आता, विकसित भारताच्या संकल्पासह, सक्षमीकरणाचा हा प्रवाह अखंडपणे वाहत आहे. आपण विकासाचा हा प्रवाह आणखी वेगवान केला पाहिजे. वाट पाहत असलेल्या प्रत्येक घरापर्यंत आपण ते पोहोचवले पाहिजे. चला, आपण पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एकजूट होऊ या आणि एक मजबूत, समृद्ध व विकसित भारत घडवण्यासाठी आपले सर्वस्व योगदान देऊया. जेव्हा हेतू स्पष्ट असतात, नेतृत्व खंबीर आणि धोरणे स्पष्ट असतात तेव्हा एखादे राष्ट्र कसे बदलू शकते, हे या १२ वर्षांनी दाखवून दिले आहे. आजचा भारत अजिंक्य आणि अढळ आहे. हा १४० कोटी नागरिकांच्या विश्वासाचा विजय आहे आणि हाच विश्वास आपल्याला २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या आपल्या महान लक्ष्यापर्यंत घेऊन जाईल

**-भाऊसाहेब वाकचौरे पाटील**
**जिल्हा संयोजक,**
**भाजपा सोशल मीडिया सेल, उत्तर नगर**

# अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करून मातंग समाजाला आरक्षण द्या

## जालना येथे मातंग संघर्ष क्रांती महामोर्चाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



**जालना -प्रतिनिधी**

अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करून मातंग समाजाला मागास निकषांवर स्वतंत्र व न्याय्य आरक्षण देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी जालना शहरात ८ जून २०२६ रोजी मातंग संघर्ष क्रांती महामोर्चा काढण्यात आला होता.

या महामोर्चाच्या माध्यमातून जालना जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या हजारो मातंग समाजबांधवांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जातींना आरक्षणाचा अधिकार दिला असला, तरी त्याचा लाभ सर्व घटकांना समान प्रमाणात मिळालेला नाही. मातंग समाज आजही शिक्षण, रोजगार, प्रशासन, राजकीय प्रतिनिधित्व, जमीनधारणा, उद्योग-व्यवसाय आणि आर्थिक विकासाच्या विविध क्षेत्रांत अतीवंचित आहे. अनुसूचित जातींच्या आरक्षणातील लाभ काही मोजक्या घटकांपुरता केंद्रित झाल्याने मातंग समाजास अपेक्षित प्रतिनिधित्व आणि प्रगती साधता आलेली नाही. भारतीय सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणास घटनात्मक मान्यता दिली असून सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाच्या वस्तुनिष्ठ निकषांवर आरक्षणाचे न्याय्य वितरण करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या न्यायमूर्ती अनंत बदर समितीने मार्च २०२६ मध्ये शासनास आपला अहवाल सादर केला आहे. त्यामुळे आता शासनाकडे आवश्यक माहिती, आकडेवारी व शिफारसी उपलब्ध असून निर्णय घेण्यास कोणताही अडथळा उरलेला नाही. आगामी पावसाळी अधिवेशनात अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा कायदा मंजूर करून मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्यात यावे आणि ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत नवीन शासकीय भरती प्रक्रिया स्थगित ठेवण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या महामोर्च्याच्या माध्यमातून पुढील प्रमुख मागण्या तत्काळ मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे:

१) अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण करून मातंग व तत्सम जातींना मागास निकषांवर आरक्षण देण्यात यावे.

२) क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग अभ्यास आयोगाच्या सर्व शिफारशींची तत्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

३) पीरकल्याण (ता. जि. जालना) येथील अतुल आघाम हत्या प्रकरणात ॲट्रॉसिटी ॲक्टची कठोर अंमलबजावणी करून संबंधित खटला विशेष न्यायालयात प्राधान्याने चालविण्यात यावा.

४) बीड येथील उमेश दळवी हत्या प्रकरणाचा फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवून दोषींना कठोर शक्षिा देण्यात यावे.

५) पैठण येथील अनमोल अहिरे या युवकाची हत्या करण्यात आली असून, सदरील प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून दोषींना कठोर शक्षिा व्हावी.

६) अतुल आघाम (पीरकल्याण), उमेश दळवी (बीड) व अनमोल अहिरे (पैठण) यांच्या पीडित कुटुंबातील प्रत्येकी एका सदस्यास शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे.

७) तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष साबळे यांनी अतुल आघाम यांच्या हत्येप्रकरणी दोषींवर ॲट्रॉसिटी *(पान २ वर)*

# आ. रोहित पवार यांच्या प्रयत्नातून जामखेड एसटी डेपोसाठी ५ नवीन बस



**जामखेड -प्रतिनिधी**

कर्जत-जामखेड मतदारसंघातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि प्रवाशाभिमुख करण्यासाठी आ.रोहित पवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून जामखेड एसटी डेपोसाठी ५ नवीन एसटी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे तालुक्यातील प्रवाशांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि दर्जेदार वाहतूक सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात आ. रोहित पवार यांनी जामखेड आणि कर्जत येथील एसटी डेपोच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करत आवश्यक निधी मंजूर करून आणला होता. दरम्यानच्या काळात सरकार बदलल्यानंतर या दोन्ही डेपोच्या बळकटीकरणासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. याच पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन कर्जत व जामखेड एसटी डेपोच्या अद्ययावतीकरणासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबरोबरच नागरिकांच्या सेवेसाठी १० नवीन एसटी बसेस देण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत जामखेड एसटी डेपोसाठी ५ नवीन एसटी बसेस मंजूर करण्यात आल्या असून त्या सेवेत दाखल झाल्या आहेत. उर्वरित ५ बसेसही लवकरच उपलब्ध व्हाव्यात यासाठी आपला पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार रोहित पवार यांनी सांगितले.

या नव्या बसेसमुळे ग्रामीण भागातील प्रवासी, विद्यार्थी, शेतकरी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना अधिक नियमित व सोयीस्कर प्रवासाची सुविधा मिळणार आहे. तसेच विविध गावांमधील बसफेऱ्या वाढविण्यास मदत होणार असून एसटी सेवेची गुणवत्ता आणखी सुधारण्यास हातभार लागणार आहे. दरम्यान, जामखेड डेपोसाठी नवीन बसेस उपलब्ध झाल्याने प्रवासी व नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत असून आमदार रोहित पवार यांच्या पाठपुराव्याबद्दल नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे..



कालिका स्टीलचे संचालक, उद्योगपती व समाजसेवक श्री. घनश्यामदासजी गोयल यांची अखिल भारतीय अग्रवाल सम्मेलनच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन अभिनंदन व शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी सोबत नगरसेवक अश्विन अंबेकर, भास्कर अंबेकर आदी उपस्थित होते.

# डॉ.सुभाषराव ढाकणे परिचर्या महाविद्यालयात पर्यावरण दिन



**जालना -प्रतिनिधी**

रोहणवाडी येथील डॉ.सुभाषराव ढाकणे कॉलेज ऑफ बी एस्सी नर्सिंग येथे जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.प्राचार्य डॉ.श्रीनाथ कुलकर्णी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.प्रा.कोमल इंगोले यांनी जागतिक पर्यावरण परिषद,पर्यावरण वैश्विक करार, पर्यावरण चळवळ, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण यावर व्याख्यान दिले.

यावेळी प्रशासकीय अधिकारी प्रा.शरद कवानकर, उपप्राचार्य पुरुषोत्तम गायकवाड,प्रा.प्रफुल गायकवाड,प्रा.अतुल थोरात,प्रा.राजकन्या कोरडे,प्रा. रिया सावळे व बी एस्सी नर्सिंग चे विद्यार्थी उपस्थित होते.

# पत्नी मानद मोलकरीण नाही, घरगुती काम न करणे म्हणजे क्रूरता नाही: मुंबई उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

**जालना - प्रतिनिधी**

''पत्नी मानद मोलकरीण नाही आणि विवाह हा समान भागीदारीचा असतो, तो सेवा करार नाही. त्यामुळे, पत्नीने स्वयंपाक, साफसफाई यांसारखी घरगुती कामे न करणे याला आपोआप क्रूरता म्हणता येणार नाही,'' असा महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने मुंबईतील कौटुंबिक न्यायालयाचा २३ जुलै २०१० रोजीचा निकाल रद्दबातल ठरवला, ज्यामध्ये एका चार्टर्ड अकाउंटंट पतीला क्रूरतेच्या कारणास्तव घटस्फोट मंजूर करण्यात आला होता. या निकालाने वैवाहिक संबंधातील समानतेच्या तत्त्वाला पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, पतीने असा आरोप केला होता की, २८ फेब्रुवारी २००२ ते ७ जुलै २००२ या अवघ्या चार महिन्यांच्या वैवाहिक काळात पत्नीने घरगुती कामे केली नाहीत, तिला व्यवस्थित जेवण बनवता येत नव्हते, घरातील वडीलधाऱ्यांचा आदर केला नाही आणि समाजात सासरच्या मंडळींना अपमानित केले. याउलट, पत्नीने हे सर्व आरोप फेटाळून लावत, उलट सासरच्यांकडूनच छळ होत असल्याचा दावा केला होता. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, घटस्फोटासाठी क्रूरतेचे कारण तेव्हाच ग्राह्य धरले जाते, जेव्हा कृती गंभीर आणि अत्यंत मानसिक किंवा शारीरिक हिंसा करणारी असेल, केवळ सामान्य घरगुती मतभेद नव्हे.

न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले आहे की, ''क्रूरतेचे कारण सिद्ध करण्यासाठी, जोडीदाराच्या मनात सतत अशी भीती असली पाहिजे की, एकत्र राहणे असह्य झाले आहे आणि त्यामुळे शारीरिक किंवा मानसिक हानी होऊ शकते.'' या प्रकरणात पती-पत्नीचा एकत्र राहण्याचा कालावधी इतका कमी होता की, त्यांना एकमेकांसोबत राहणे अशक्य झाले होते, हे समजण्यापलीकडचे आहे. लग्नाच्या सुरुवातीच्या काळातील किरकोळ वाद आणि मतभेद हे लग्नातील सामान्य चढ-उतार म्हणून पाहिले पाहिजेत आणि त्यांना क्रूरता मानून घटस्फोटाचा आधार बनवता येणार नाही, असेही न्यायालयाने नमूद केले.

या निकालावर आपली प्रतिक्रिया देताना, **नोटरी असोसिएशन, जालनाचे अध्यक्ष, ॲड. महेश धन्नावत** म्हणाले, ''मुंबई उच्च न्यायालयाचा हा निकाल अत्यंत स्वागतार्ह आणि दूरगामी परिणाम करणारा आहे. या निकालाने वैवाहिक जीवनातील पती-पत्नीच्या समान जबाबदारीच्या आणि समानतेच्या संकल्पनेला बळकटी दिली आहे. अनेकदा घटस्फोटाच्या प्रकरणांमध्ये घरगुती कामांवरून होणाऱ्या क्षुल्लक वादांना क्रूरता म्हणून सादर केले जाते. मात्र, न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, विवाह हा सेवा करार नाही, जिथे पत्नीकडून मोलकरणीप्रमाणे कामाची अपेक्षा केली जावी.''

ॲड. धन्नावत पुढे म्हणाले, ''न्यायालयाने हेही स्पष्ट केले आहे की, क्रूरतेची कृती दीर्घकाळ आणि सातत्यपूर्ण असली पाहिजे, ज्यामुळे नात्यात इतकी कटुता निर्माण झाली असेल की अन्यायग्रस्त पक्षाला दुसऱ्यासोबत राहणे अशक्य होईल. या प्रकरणात, केवळ तीन महिन्यांच्या सहवासात अशा टोकाच्या निष्कर्षावर येणे चुकीचे आहे. हा निकाल कौटुंबिक न्यायालयांना अशा प्रकरणांमध्ये अधिक संवेदनशीलतेने *(पान २ वर)*

# धावडा येथे उन्हातही बालसंस्कार शिबिर संपन्न

**दत्ता देशमुख**

सध्या जालना जिल्ह्यासह राज्यभरात तीव्र उष्णतेची लाट असतानाही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेले बाल आनंद महोत्सव व उन्हाळी संस्कार शिबिर यशस्वीपणे पार पाडणे हे अत्यंत कौतुकास्पद कार्य असल्याचे मत ग्रामीण साहित्यिक तथा केंद्रप्रमुख सुधाकर चिंधोटे यांनी व्यक्त केले. पी.एम. श्री जिल्हा परिषद प्रशाला, धावडा (ता. भोकरदन) येथे आयोजित संस्कार शिबिराच्या दुसऱ्या दिवशी आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी संस्कार, शिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. याप्रसंगी दत्ता




गवळी यांनी माता सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव करत विद्यार्थ्यांनी त्यांच्या उपकारांची जाणीव कायम ठेवावी, असे विचार मांडले. दि. ६ जून ते ९ जून दरम्यान सुरू असलेल्या या शिबिरात विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व प्रेरणादायी उपक्रमांची रेलचेल पाहायला मिळत आहे. दोन्ही वक्त्यांनी विविध बालकवितांचे सादरीकरण करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. तसेच थोर महापुरुषांचे विचार अंगीकारून जीवन समृद्ध करण्याचे आवाहनही करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक दशरथ बडगे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षक जे. ए. पठाण उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी नारायण पाडळे, दिलीप तायडे, मुरलीधर पवार, अनया लव्हाणे, जुबेरशहा पठाण, रमेश सिनकर,

**बाल आनंदोत्सव उन्हाळी शिबिर**

गजानन फदाट, विजय पाटील, सपकाळ सर व पैठणे मामा यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन डॉ. दत्तात्रय सपकाळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन नारायण पाडळे यांनी केले. या कार्यक्रमास सुमारे ३५० विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आयोजित या संस्कार शिबिराचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# ग्रामसंसद कार्यालयात शिवराज्याभिषेकदिन साजरा



**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील ग्रामसंसद कार्यालयात शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जय भवानी, जय शिवाजीच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. या वेळी प्रसिद्ध शिवव्याख्याते श्री सतिष उखर्डे संदीप जाधव सर नगरसेवक सर्जेराव कुमकर, अजीज भाई, विक्रम उकांडे, बाबुराव साबळे, बाबासाहेब जमधडे, दिगंबर भिसे, सुभाष घोडे, योगेश गायमुखे दत्ता पंडीत, सुनिल भाले आणि रामदास धनवाई यांच्यासह आशा वर्कर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.